तरुण भारत

शुक्रवार, ११ डिसेंबर २०१५

# पर्यावरण संवर्धनाच्या उपाययोजना राबवा!

## गोव्याचे मंत्री राजेंद्र आर्लेकर यांचे प्रतिपादन : केर येथे मुंबई विद्यापीठाचे शिबीर

प्रतिनिधी

दोडामार्ग

जागतिक तापमानवाढीमुळे जग जळत आहे. पृथ्वीवरील संपूर्ण सजीवसृष्टी धोक्यात आली आहे. पर्यावरणाच्या असंतुलनामुळे दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी यांच्यासारख्या भयानक संकटांना थांबवायचे असल्यास तरुणांनी पुढाकार घेऊन पर्यावरण संवर्धनाच्या विविध उपायायोजना राबवाव्यात. केवळ चार भिंतीच्या आत राहून पुस्तकी पर्यावरण न शिकता आपल्या संस्कृतीचा व परिसराचा अभ्यास करावा. संस्कृतीनेच आपल्याला पर्यावरण संवर्धन शिकविले आहे, असे प्रतिपादन गोवा राज्याचे वन, पर्यावरण व पंचायत मंत्री राजेंद्र आर्लेकर यांनी केले.

मुंबई विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने केर येथे आयोजित केलेल्या सात दिवशीय विद्यापीठस्तरीय विशेष निवासी शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**जग जळतेय!**

- **तापमान वाढीमुळे सजीवसृष्टी धोक्यात आली आहे!**
- **संस्कृतीनेच आपल्याला पर्यावरण संवर्धन शिकविले!**
- **कोकणातील १०० स्वयंसेवकांचा सहभाग**

यावेळी मुंबई विद्यापीठ महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील, मुंबई विद्यापीठ. रा. से. यो. विभागाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे, केर–भेकुर्ली ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच प्रेमानंद देसाई, संस्थेचे सचिव मोहन खातू, सदस्य भाई परमेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये होते.

प्रारंभी एनएसएस गीत व दीप प्रज्वलनाने शिबिराचे उद्‌घाटन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले. सरपंच देसाई यांनी गावात राबविलेल्या योजना व मिळालेल्या पुरस्कारांची माहिती दिली. प्रा. बिडवे, हेगशेटये यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्या हस्ते आर्लेकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. पाटील व प्रा. बिडवे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. पाटील यांनी तर प्रेमानंद देसाई यांचा सत्कार आर्लेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

शिबिरासाठी मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कोकणपट्टीतील महाविद्यालयातील १०० स्वयंसेवक उपस्थित होते. शिबीर यशस्वीतेसाठी रा. से. यो. चे प्रा. आर. ए. मोरे, डॉ. एस. यु. दरेकर यांनी परिश्रम घेतले. प्रस्तावना व स्वागत प्राचार्य पाटील, सूत्रसंचालन प्रा. सोपान जाधव तर आभार प्रा. मोरे यांनी मानले.